## नाट्यपंढरीचे जनक : विष्णुदास भावे

दिगंबर बागणीकर

सांगलीच्या नाट्यक्षेत्रात फार मोठा दबदबा होता. येथील नाट्यरसिकांनी नाट्याची चळवळ जोपासली. मराठी रंगभूमीचे जन्मस्थान म्हणून सांगली शहर परिचित आहे. विष्णुदास भावे यांनी १८४३ मध्ये राजवाड्यातील दरबार हॉलमध्ये मराठीतील पहिले नाटक 'सीता स्वयंवर' साकारले. त्यानंतर पहिली सांगलीकर नाटक मंडळी आकारली. १८५४ मध्ये विष्णुदासांनी 'राजा गोपीचंद' हे हिंदी नाटक साकारले आणि ते हिंदी रंगभूमीचे जनक म्हणूनच ओळखले जाऊ लागले. त्यांनी एकूण ५२ नाटके लिहिली. त्यात प्रामुख्याने पौराणिक नाटके आहेत.

५ नोव्हेंबर १८४३ रोजी विष्णुदासांनी 'सीता स्वयंवर' या पहिल्या मराठी नाटकाचा प्रयोग सांगलीत केला. पण त्यापूर्वी ते कठपुतळ्यांचे खेळ करीत असत. त्यांनी बनविल्या खेळविलेल्या या कठपुतळ्या त्यांच्या निधनानंतर तशाच पेटाऱ्यात पडून राहिल्या होत्या व भावे यांच्या कठपुतळी खेळाच्या तीनचार संहिता उपलब्ध आहेत. द्रौपदी स्वयंवर ढोंगी महंताची नक्कल अशी त्यांची नावे आणि कठपुतळ्या या लाकडी असल्या तरी अतिशय हलक्या होत्या. शक्यतो उंबराच्या लाकडाचा व कागदांचा लगदा यापासून बनविल्या जात. रेखीव आकार, प्रमाणबद्धता असूनही त्या चाकावर बसविलेल्या होत्या. त्या लोखंडी काठीच्या आधाराने आणि दोरीच्या साह्याने अशा दोन्ही प्रकारे खेळवता येतात.

कर्नाटकातील भागवत मंडळी 'खेळ' पाहून सांगलीचे संस्थानिक थोरले चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांनी आपल्या पदरी असणाऱ्या सुभेदार अमृतराव भावे यांच्या विष्णू या बुद्धिमान मुलाला भागवत नाटक मंडळीतील नाटकाप्रमाणे खेळ करण्याची आज्ञा केली. त्यांची आज्ञा प्रमाण मानून १८४३ साली सांगलीच्या राजवाड्यातील दरबार हॉलमध्ये मराठीतील पहिले नाटक 'सीता स्वयंवर' नाटकाचा जन्म झाला. त्यासाठी त्यांनी कानडी नाट्य परंपरेत आवश्यक तेथे बदल केले. भाव्यांनी स्वत:च नवीन पदाची रचना केली. 'सीता स्वयंवराण्यान आरि अहिल्योध्दार आख्यान श्रीमंतांपुढे सादर केले. हेच मराठीतील पहिले नाटक मानण्यात येते. इथंच मराठी रंगभमूची मुहूर्तमेढ रोवली गेली. या सर्व आख्यानात खुद्द विष्णुदासांनी 'नाट्यकवितासंग्रह' या नावाने १८८५ मध्ये संग्रहित केले. 'सीतास्वयंवर' मराठी रंगभूमीवर आले तो दिवस होत ५ नोव्हेंबर १८४३ चा म्हणूनच हा दिवस नाट्यपंढरीत 'माठी रंगभूमी दिन' म्हणून साजरा केला जातो. विष्णुदासांनी रामावतारी आख्यानेच सादर केली. हीच मराठी रंगभूमीची सुरुवात होती.

१८४३ ते १८५१ या काळात विष्णुदासांना राजाश्रय लाभला. विष्णुदासांच्या कंपनीने मुंबईलाही नाटकाचे प्रयोग केले. तेथे प्रेक्षकांनी या नाटकांना रसिकतेने राजाश्रयानंतर लोकाश्रयाला 'सांगलीकर नाटककार मंडळी' फिरतीवर निघाली. १८४३ साली मुंबईच्या दौऱ्यापासून या सांगलीकर मंडळीनी तिकीटे लावून प्रयोग सादर केले जाऊ लागले. पैसे मोजून तिकिटे काढून नाटक पाहण्याची सवय लावली. राजाश्रयानंतर प्रशासकांनी विष्णुदासांच्या नाटकावर झालेल्या खर्चाची वसुली सुरु केली. त्याचा परिणाम विष्णुदासांनी सांगलीकर नाटक मंडळी स्थापन करून १८५१ ते १८६२ सालापर्यंत एकूण सात दौरे केले. १४-२-१८५३ साली प्रथमच वृत्तपत्रातून जाहिराती आल्या. मुंबईची ग्रँट रोड थिएटरमध्ये मराठी नाटकाचा प्रयोग झाला. प्रथमच गोपीचंद या हिंदी नाटकाचा प्रयोग १९५४ मध्ये झाला. त्यामुळे हिंदी रंगभूमीचे जनक म्हणून विष्णुदासांचे नाव झाले. त्याचबरोबर सांगलीचे नाव अखिल भारतात गाजले म्हणूनच असेल सांगली ही नाट्यपंढरी म्हणून ओळखली जाऊ लागली. या विष्णुदासांनी एकूण ५२ नाटके लिहिली. यांची सर्व नाटके पौराणिक होती. नाटक मंडळीत पुढष १८६२ सुमारास विष्णुदासांनी

नाट्य संन्यास घेतला. पण त्यापूर्वी दरबारचे कर्ज व तसलमातीचा उलगडा करण्यास हा नाट्याचार्य विसरला नाही. सांगलीकर संगीत हिंदी नाटक मंडळी आणि नूतन सांगलीकर मंडळीनी विष्णुदस भावे यांच्या पद्धतीची नाटके १९१० सालापर्यंत चालू होती. ९ ऑगस्ट १९०९ साली नाट्याचार्य विष्णुदास अमृत भावे यांचे निधन झाले. त्यांच्या नावाने भावे पुरस्कार ५ नोव्हेंबर रोजी रंगभूमी दिनादिवशी देण्यात येतो. त्यांच्या नावाने सांगलीतील विष्णुदास भावे नाट्यमंदिर उभारले आहे. नाटक कंपनीने नाटक बसविले की त्याचा पहिला प्रयोग या नाट्यपंढरीच्या विष्णुदास भावे रंगमंचावर करायचा. ही प्रथाच पडून गेली आहे. नाट्यपंढरीबद्दल सर्वच नाट्यरसिकांना मनोमन आदराचे स्थान आहे.